# पुस्तिका-**8**

## <u>धोरणात्मक कार्यपध्दतीत अनुसरण्यात येणारी पध्दती</u>

**<u>विविधी बाबींचा निर्णय घेण्यासाठी अनुसरण्यात येणारी पध्दती :</u>**

धोरणात्मक बाबींशी संबंधित असलेल्या नियमांना धरुनच, प्रस्तावाचे समर्थन केले जाते व असाच समर्थन केलेला प्रस्ताव,निर्णय घेणा-या संबंधित वरिष्ठ/सक्षम अध्का-यांकडे निर्णयासाठी सादर केला जातो.

**<u>कागदोपत्री पध्दती/घालून दिलेली पध्दती/नियोजिन प्रमाण/महत्वाच्या बाबींकरिता घेण्यात आलेला विशिष्ट निर्णय, ज्या निर्णयाचे रुपांतर नियमांत होते/ उपरोक्त घटक हे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतील विविध स्तर आहेत.</u>**

प्रथम दुय्यम कर्मचारीवृंद किंवा/आणि संबंधित वरिष्ठ अधिका-यांशी अनौपचारिक चर्चा करुन सदर प्रस्ताव पुढे पाठविला जातो. आवश्यकता वाटल्यास बाबींचा तपशीलवार चर्चा करण्यासाठी संबंधित अधिका-यांची संयुक्त बैठकही घेतली जाते.

उप महापालिका आयुक्त किंवा/आणि अतिरिक्त महापालिका आयुक्त किंवा महापालिका आयुक्त या स्तरांवर अंतिम निर्णय घेण्यात येतो.

**<u>लोकांपर्यंत निर्णय पोहाचविण्याची व्यवस्था</u>**

घेतलेल्या निर्णयांचा प्रत्यक्ष परिणाम लोकांवर होणार नसल्याने, मंजूर/मान्य केलेल्या निर्णयांची किंवा आज्ञेची अंमलबजावणी करण्यासाठी विभाग अधिका-यांना लेखी कळविले जाते.

**<u>विविध स्तरांवरील अधिका-यांची मते निर्णय घेण्याच्या प्रक्रियासाठी घेतली जातात.</u>**

बहुतांशी उप महानगरपालिका आयुक्त यांच्या स्तरावर बाबीवर निर्णय घेतले जातात. काही केसेसमध्ये मुख्यलेखापाल/ विधी अधिकारी यांची तज्ञ मते घेतली जातात.

## निर्णय प्रक्रियेतील अंतिम अधिकारी

घटनांवर अवलंबित धोरणाविषयक प्रकरणे/ पूर्व मंजूरी/ सक्षम अधिका-यांची मान्यता आणि अधिकारांचे प्रदत्तीकरण या गोष्टी विचारात घेऊन उप महानगरपालिका आयुक्त / अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त/ महानगरपालिका आयुक्त अंतिम निर्णय घेतात.

## कार्यान्वितीची पध्दती

उपरोक्त प्रत्येक टप्प्यातच नियम आणि विनियम मंजूर केले जातात. विनंतीवरुन आणि अवश्यकतांची पूर्तता झाल्यावर वरिष्ठ अधिका-यांकडून निर्णय घेतले जातात.

## निर्णय प्रक्रियेत गुंतलेल्या अधिका-यांचा पदभार

सहाय्यक आयुक्त/ उप महानगरपालिका आयुक्त / महानगरपालिका आयुक्त यांच्या स्तरावर निर्णय घेतले जातात.

## उपरोल्लेखित अधिका-यांना संपर्क करण्यासाठी माहिती

पूर्व नियुक्तीने वरील अधिका-यांची प्रत्यक्ष भेट होऊ शकते किंवा सहाय्यक आयुक्त (जन माहिती अधिकारी) यांच्या कार्यालयातूनही होऊ शकते.

निर्णयामुळे जर समाधान झाले नाही, तर उपरोल्लेखित वरिष्ठ अधिका-यांकडे माहितीचा अधिकार कायदा 2005 मधील तरतूदीनुसार अपिल करण्याचा अधिकार आहे.